विषय :- महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती ,
अधिनियम १९६१ चे कलम ९६ मधील तरतुदीनुसार
मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारांचे
प्रत्यायोजन

सामान्य प्रशासन विभाग,जिल्हा परिषद वाशिम
परिपत्रक क्रमांक जाक्र/जिपवा/साप्रवि/आस्था-१/ १८६२ /२०१९
दिनांक :-१३ मे २०१९

वाचा :- १. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१
२. या कार्यालयाचे आदेश क्र.जाक्र/जिपवा/साप्रवि/आस्था-१/ ६२८८/१८ दि.३०/११/२०१८

**-: आदेश :-**

उपरोक्त संदर्भीय क्र.२ चे आदेशामधील क्रमांक २ वर प्रवास भत्ता देयके, रात्रपाळी दयके व अतिकालीन भत्ता देयके मंजुर करणे बाबतचे अधिकारात खालील प्रमाणे अशंत: बदल करुन सुधारणा करण्यात येत आहे. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ चे कलम ९६ मधील तरतुदीनुसार प्रदान करणेत आलेल्या ,मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारापैकी काही महत्वाचे अधिकार या आदेशान्वये प्रत्यायोजित करण्यात येत आहे.प्रत्यायोजन कार्यपध्दती बाबत पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ , महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखांसहीता अधिनियम १९६८ मधिल खालील प्रमाणे काही महत्वांचे अधिकार खाते प्रमुख , उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा) यांना याव्दारे प्रदान करण्यात येत आहे. सदर आदेश हा मागील प्रकरणा करिता मंजुरीसाठी देखील लागू राहील.

| अ.क्र. | अधिकाराचे स्वरुप | नियम / कलम किंवा शासन निर्णय | अधिकार कोणाला प्रदान केले | अधिकार कोणत्या मर्यादेपर्यत प्रदान करण्यात आले | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | वर्ग ३ व वर्ग ४ कर्मचा-यांचे विशेष रजा मंजुर करणे बाबत ( पक्षघात, कर्क रोग व क्षयरोग, कुष्टरोग ) | महाराष्ट्र नागरी सेवा (रजा ) नियम १९८१ नुसार व वेळोवेळी निर्गमित झालेल्या शासन निर्णया नुसार | सवंधीत खाते प्रमुख | अधिपत्याखालील संबधित संवर्गातील वर्ग ३ व वर्ग ४ कर्मचा-यांचे विशेष रजा मंजुर करणे ( पक्षघात, कर्क रोग व क्षयरोग, कुष्टरोग ) | महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ नुसार तसेच वेळोवेळी निर्गमित झालेल्या शासन निर्णयानुसार |
| २ | प्रवास भत्ता देयके, वाहन चालक यांचे अतिकालीन भत्ता देयके व रात्रपाळी देयके. | महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ चे कलम ९६ नुसार | सबंधीत खाते प्रमुख<br>गट विकास अधिकारी<br>कार्यालय प्रमुख | रु.१०,०००/- पर्यत | मंजुर अंदाजपत्रकीय तरतुद तसेच त्यांचे अधिनस्त देण्यात आलेले वित्तीय मर्यादेत व महा. ना.से. (नियम ) वित्तीय नियम महा. जि.प. व पं.स. लेखा संहिता व इतर सबंधीत नियमानुसार घालून देण्यात आलेल्या निर्णयाचे अधिन राहून. लेखा सहिता अधिनियम नुसार सदरची देयके विहीत मुदतीमध्ये सादर केले नसल्या अमान्य करावे. |

Scanned by CamScanner

खाते प्रमुख यांनी प्रकरणांना मंजुरी देताना अधिनियम व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतूदी काटेकोरपणे तपासुन मंजुरी देण्यात यावी.

वरील प्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारामध्ये कोणत्याही वेळी कोणत्याही कारणास्तव बदल करण्याची किंवा काढुन घेण्याचे अधिकार राखुन ठेवण्यात येत आहे.प्रस्तुत आदेश स्थायी आदेश संचीकेत सामील करावा.

प्रस्तुत आदेशाची अमलबजावणी , आदेशाच्या दिनांकापासुन करण्यात यावी.

13/05/19

(दीपक कुमार मीना)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद ,वाशिम

**प्रतिलिपी :-**

१) मा.विभागीय आयुक्त, अमरावती विभाग अमरावती यांना माहीती करीता सादर.

२) अति.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.वाशिम यांना माहीती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.

३) प्रकल्प संचालक जि.ग्रा.वि. यंत्रणा ,वाशिम यांना माहीती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.

४) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा) जि.प.वाशिम यांना माहीती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.

५) मुख्य लेखा वित्त अधिकारी जि.प.वाशिम यांना माहीती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.

६) खाते प्रमुख - - - - - - - - - - - -- - (सर्व) जि.प.वाशिम यांना माहीती व योग्य त्या कार्यवाहीस्तव.

७) गट विकास अधिकारी / सहा. गट विकास अधिकारी पं.स.- - - - -- - - - - - - - - - - - (सर्व) यांना माहीती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.

८) बाल विकास प्रकल्प अधिकारी ए.बा.वि.से.यो.- - - - - - - - (सर्व) यांना माहीती व कार्यवाहीस्तव.

९) उप अभियंता जि.प.बांधकाम/ल.सि./ग्रा.पा.पु. उप विभाग - - - -- - - - - - - - - - (सर्व) यांना माहीती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.

१०) गट शिक्षणाधिकारी पं.स. - - -- - - - - - - - (सर्व) यांना माहीती व कार्यवाहीस्तव.

११) वैद्यकिय अधिकारी प्रा.आ.के.- - - - - - - ---- - - - - - - (सर्व) यांना माहीती व कार्यवाहीस्तव.

१२) मुख्याध्यापक जिल्हा परिषद हायस्कुल - - - - - - - - - - - (सर्व) यांना माहीती व कार्यवाहीस्तव.

१३) तालुका आरोग्य अधिकारी - - - - - - - - - - - - - - - - -- -(सर्व) यांना माहीती व कार्यवाहीस्तव.

13/05/19

(दीपक कुमार मीना)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद ,वाशिम

Scanned by CamScanner